**वन कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण (४४१५ ०१५४) या योजनेअंतर्गत चिखलदरा प्रशिक्षण संस्थेतील पायाभूत सुविधा विकसीत करण्याकरीता निधी वितरित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९०/फ-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
**दिनांक :- २८ मार्च, २०१९**

<u>वाचा :-</u>

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.२८/५१६/२०१८-१९, दिनांक २७.०६.२०१८
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.२८/८६८/२०१८-१९, दिनांक १६.०८.२०१८
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१८/प्र.क्र.७१/फ-२, दिनांक २६.०७.२०१८
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१८/प्र.क्र.८१/फ-२, दिनांक २४.०९.२०१८
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्र. :- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.८३/१२६८/२०१८-१९, दिनांक १६.१०.२०१८, क्र.१३४२, दिनांक ३१.१०.२०१८ व क्र.१९३१, दिनांक २५.०१.२०१९
७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१.०१.२०१९
९. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३,दिनांक ०८ मार्च, २०१९
१०. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९०/फ-९, दिनांक २८.०२.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१८-१९ मधील राज्यस्तरीय योजने अंतर्गत वन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (४४१५ ०१५४) या योजनेअंतर्गत १८०.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित आहे. माहे नोव्हेंबरच्या अधिवेशनात मंजूर झालेल्या पुरवणी मागणीद्वारे रु.१४८६.९५ लक्ष असे एकूण रु.१६६६.९५ लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. परंतू आता आठमाही सुधारीत अंदाजानुसार रु.१४९६.४२ लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. आतापर्यत चिखलदरा, जि. अमरावती येथील वन प्रशिक्षण संस्थेकरीता कार्यालयीन खर्च व इतर खर्चासाठी संदर्भ क्र.४ व ५ च्या शासन निर्णयान्वये रु.१२६.०० लक्ष व चिखलदरा प्रशिक्षण संस्थेतील पायाभूत सुविधा विकसीत करण्याकरीता प्रस्तावित १३ बांधकामासाठी

संदर्भ क्र.१० च्या शासन निर्णयान्वये रु.१३७६.४७ लक्ष असा एकूण रु.१५०२.४७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता आठमाही सुधारित अंदाजानुसार सदर योजने अंतर्गत रु.१६४.४८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी शिल्लक आहे.

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.८ च्या परिपत्रकान्वये दिनांक ०१.०२.२०१९ नंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असेल तरीही निविदा प्रसिध्द करता येणार नाही. मात्र दिनांक ०१.०२.२०१९ पूर्वी निविदा प्रसिध्द झालेल्या प्रकरणात पुढील सर्व प्रक्रीया पूर्ण करता येतील असे विहित करण्यात आले आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.९ च्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता निधी वितरण /पुनर्विनियोजन प्रस्तावाच्या अनुषंगाने निधीचे वितरण करण्यात यावे, असे आदेश आहेत. सदर निधी वितरित करतांना वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ व ७ च्या परिपत्रकातील अटीची पूर्तता व सूचनांचे पालन करण्याचे कळविले आहे.

अर्थसंकल्पीत नियतव्ययाच्या अनुषंगाने वन कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण (४४१५ ०१५४) या लेखाशिर्षा अंतर्गत चिखलदरा प्रशिक्षण संस्थेतील पायाभूत सुविधा विकसीत करण्याकरीता रु.१६४.४८ लक्ष रकमेच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करुन BDS वर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावातील कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.२,३ व ६ वरील शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१,२,३ व ४ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, चिखलदरा प्रशिक्षण संस्थेतील पायाभूत सुविधा विकसीत करण्याकरीता रु.१६४.४८ लक्ष इतका निधी वन कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण (४४१५-०१५४) (५०-इतर खर्च) या लेखाशिर्षा अंतर्गत खालील अटींच्या अधिन राहून वितरीत करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना घ्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.
२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.

४. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

५. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांची राहील.

७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

८. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१०.सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८,२५.०१.२०१९, ३१.०१.२०१९ व ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११.शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२.सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१३.वितरित केलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक-सी-१०, प्रधान शिर्ष ४४१५, कृषी विषयक संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च, ०६-वनीकरण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनाअंतर्गत योजना,

२७७-शिक्षण, (००) (०३) वन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (राज्य) (४४१५-०१५४) या लेखा शिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३११४४४२९४३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.31 14:47:40 +05'30'

**( सुजय दोडल )**
**सह सचिव (वने)**
महसूल व वन विभाग

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. मुख्य वनसंरक्षक (संशोधन), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-१), मंत्रालय, मुंबई-३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०.फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११.कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)